Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

80.

# जागतिकीकरणात स्त्रिया

**खेत्री कुंडलिक रघुनाथ**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठ औरंगाबाद.

**जागतिकीकरण आणि कुटूंब व्यवस्था :**

भारतीय समाजव्यवस्थेचा कणा म्हणून कुटूंब संस्थेकडे पाहिले जाते. भारतीय संस्कृतीची वाहक म्हणून कुटूंबाचा भारतीय समाजाचे महत्त्वाचे अंग आहे. या कुटूंबाचा आत्मा म्हणजे त्या कुटूंबातील स्त्री होय. कोणतेही कुटूंब स्त्री शिवाय पूर्ण होऊच शकत नाही. म्हणूनच स्त्रीयांना कुटूंबाचा कणा म्हणटले जाते. खाजगीकरण आधुनिकीकरण आणि जागतिकीकरण या प्रक्रीयेत भारतीय समाजव्यवस्था ज्या वेगाने परिवतीत होत आहे. त्याच वेगाने भारतीय कुटूंब व्यवस्था देखिल बदलत आहे आणि त्याचे चांगले व वाईट परिणाम भारतीय स्त्रीवर झालेले दिसून येत आहेत यामुळे भारतीय समाजात स्त्रीयांचे अनेक प्रश्न व समस्या निर्माण झाल्या आहेत.

जागतिकीकरणाच्या या प्रक्रीयेत भारत 1991 मध्ये सामील झाला. जागतिकीकरणाने भांडवलशाही अतिशय वेगाने विकसीत झाली या भांडवलशाहीचे विपरीत परिणाम कुटूंब व्यवस्थेवर व स्त्रीयांनवर झालेले दिसून येतात.

आज सर्वत्र जागतिकीकरणाची भाषा बोलली जात आहे. या जागतिकीकरणात फक्त भारतीय शहरी समाज सहभागी आहे असे नाही तर भारतीय ग्रामीण समाजावर देखिल जागतिकीकरणाचा प्रभाव दिसून येतो. भारतीय ग्रामीण कुटूंब व्यवस्था बदलत आहे. यामुळे स्त्रीयाचे महत्त्व कमी होत आहे. विवाहसंस्था शिक्षणसंस्था धर्म संस्था आणि अर्थसंस्था वेगाने परीवर्तन पावत आहेत. भारतीय ग्रामीण समाजात असणारी संयुक्त कुटूंब पध्दती मोडीत निघत आहे. मुलांच्या समाजिककरणावर त्याचे विपरीत परिणाम होत आहेत. म्हणून भारतीय ग्रामीण समाजात वाढती बेरोजगारी, वाढती गरीबी आणि वाढती गुन्हेगारी या समस्या वेगाने वाढत आहेत याचे सर्वत मुळ कारण म्हणजे जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेत स्त्रीयांना कुठेही महत्त्व देण्यात आले नाही यामुळे स्त्रीयांच्या समस्या निर्माण झाल्या आहेत या समस्या निर्माण होत आहेत.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :-**

1) भारतीय स्त्री समस्येचा आढवा घेणे.
2) भारतीय कुटूंब व्यवस्थेचा आढावा घेणे.
3) जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या स्त्री समस्याचा शोध घेणे.
4) सामाजिककरणात स्त्रीयांची भुमिका अभ्यासणे.

**जागतिकरणात स्त्रिया :**

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये कुटूंबात स्त्रियांना केंद्रबिंदू मानले जाते. परंतू स्त्रियांच्या स्थितीमध्ये जागतिकीकरणामुळे परिवर्तन झाले आहे. त्यामुळे कुटूंब व्यवस्थेत देखिल बदल झाला आहे. रोजगार आणि शिक्षणाच्या संधी शोधण्यासाठी तरूण पिढी स्थलांतर करत आहेत. कुटूंबामध्ये व्यक्तीवादाचे तत्त्व आले आहे. स्त्री हा भारतीय कुटूंब व्यवस्थेचा आत्मा आहे. कारण स्त्रीशिवाय कुटूंब सूव्यवस्थती राहूच शकत नाही. पण जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेमध्ये संयुक्त कुटूंबाचे विभाजन होऊन विभक्त कुटूंब पध्दती आमलात येत आहे. यामुळे कुटूंबात मुलांच्या सामाजिकरणावर त्याचे विपरीत परिणाम होत आहेत. यामुळे मुले वाईट मार्गाला जाऊन समाजात अनेक नविन समस्या निर्माण होत आहेत.

जागतिकीकरणाची ही प्रक्रिया भांडवल शाहीवर आधारित असल्याने या प्रक्रियेत पुरूष सामील झाला पण स्त्री ही आर्थिक कमकुवत असल्याने किंवा आर्थिक स्वातंत्र्य नसल्यामुळे या प्रक्रीयेत सामील होवू शकली नाही .

**जागतिकीकरण आणि संयुक्त कुटूंब पध्दती :-**

भारतीय ग्रामीण समाजात असणारी संयुक्त कुटूंब पध्दती जागतिकीकरणामुळे मोडीत निघत असल्याचे चित्र आज समोर येत आहे. संयुक्त कुटूंबात स्त्रियांना महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे परंतू विभक्त कुटूंबातील सर्व हक्क व अधिकार पुरूषाकडे असल्याचे दिसून येतात. यामुळे स्त्रिया परावलंबी असल्याचे दिसूनयेते. आणि जागतिकीकरणाची प्रक्रिया मुळातच भांडवली प्रक्रिया आहे. यामुळे या जागतिकीकरणाचा प्रक्रियेत स्त्रिया अधिकच कमकुवत होत आहेत. स्त्रियांना आर्थिक मदत कुटूंबातून होत असते पण जागतिकीकरणात संयुक्त कूटूंब पध्दती मोडीत निघाली व स्त्रियांच्या समस्येत वाढ झाली असे चित्र आज भारतीय समाजात दिसत आहे.